'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई Email ID : shabdarutu@gmail.com

* वर्ष २ रे * अंक ४४ वा * रविवार दि. ०३ ऑगस्ट २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

### दिव्या देशमुख ने पटकावला महिला बुद्धिबळ वर्ल्ड कप

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या १९ वर्षीय बुद्धिबळ खेळाडू दिव्या देशमुखने जॉर्जियातील बटुमी येथे झालेल्या महिला बुद्धिबळ वर्ल्ड कप स्पर्धेचे विजेतपद पटकावले आहे. ती ही स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली आहे. अंतिम सामन्यात तिने चौथ्या मानांकित हम्पी कोनुरुवर टायब्रेकमध्ये मात केली. ती आशिया चॅम्पियनशिप आणि वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिपसह अनेक मानाच्या स्पर्धांचे सुवर्णपदक मिळवणारी खेळाडू आहे. या विजयाबद्दल तिचे सर्व स्तरांतून कौतूक करण्यात येत आहे.

# मतचोरीचे आरोप निराधार

## त्याकडे दुर्लक्ष करा; निवडणूक आयोग

**नवी दिल्ली :** विरोधी पक्षनेते गांधी यांनी केलेल्या आरोपांवर भारतीय निवडणूक आयोगाने प्रतिक्रिया देत जोरदार टीका केली. राहुल गांधींच्या आरोपांना उत्तर देताना निवडणूक आयोगाने म्हटले. निवडणूक आयोग दररोज केल्या जाणाऱ्या अशा निराधार आरोपांकडे दुर्लक्ष करतो. दररोज धमक्या दिल्या जात असूनही, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने काम करणाऱ्या सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना अशा बेजबाबदार विधानांकडे लक्ष देऊ नका असे आवाहन केले.

संसदेबाहेर पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी यापूर्वी निवडणूक आयोगावर भाजपच्या इशाऱ्यावर काम करण्याचा आरोप केला होता. निवडणूक आयोग मतचोरीत सहभागी असल्याचे आमच्याकडे उघड आणि बंद पुरावे आहेत. मी हे १००% पुराव्यांसह सांगत आहे. आणि जेव्हा आम्ही ते (पुरावे) जाहीर करू, तेव्हा संपूर्ण देशाला कळेल की निवडणूक आयोग मतचोरीला चालना देत आहे. आणि ते हे कोणासाठी करत आहेत? ते हे भाजपसाठी करत आहेत, असे त्यांनी पत्रकारांना सांगितले. मतदारांमध्ये






फसवणूक झाल्याचा संशय आल्यानंतर आणि निवडणूक आयोगाकडून कोणतेही सहकार्य न मिळाल्याने त्यांच्या पक्षाने या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी केल्याचा दावा काँग्रेस नेत्याने केला. आम्हाला मतदार चोरीचा संशय होता. निवडणूक आयोग तपासात मदत करत नसल्याने, आम्ही स्वतः हून तपास केला. सहा महिने लागले आणि आम्हाला जे सापडले ते एक अणुबॉम्ब आहे आणि जेव्हा हा अणुबॉम्ब स्फोट होईल तेव्हा तुम्हाला देशात निवडणूक आयोग दिसणार नाही, असे राहुल गांधी म्हणाले.

> लोकसभा निवडणुकीत कशी धांधली होऊ शकते हे आम्ही येत्या काळात तुम्हाला सिद्ध करू आणि ते घडलेही आहे. भारताच्या पंतप्रधानांकडे खूपच कमी बहुमत आहे. जर १०-१५ जागांवरही हेराफेरी झाली नसती तर ते भारताचे पंतप्रधान झाले नसते. राहुल गांधी यांनी शनिवारी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित वार्षिक कायदेशीर परिषद-२०२५ मध्ये हे बोलले.

# बलात्कार प्रकरणात माजी खासदार रेवण्णा दोषी

**बंगळूरू :** हासनचे माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांना बलात्कार प्रकरणात न्यायालयानं दोषी ठरवलं आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींशी संबंधित प्रकरणांची सुनावणी करणाऱ्या बंगळूरमधील विशेष न्यायालयाने दिला आहे. २ ऑगस्ट रोजी न्यायालय शिक्षेचा कालावधी जाहीर करणार आहे.

निकाल जाहीर होताच प्रज्वल रेवण्णा न्यायालयात भावनिक झाले आणि रडू लागले. न्यायालयातून बाहेर पडतानाही ते सतत रडत होते. एफआयआर दाखल झाल्यानंतर अवघ्या १४ महिन्यांत या प्रकरणाचा



निर्णय देण्यात आला आहे. या प्रकरणात पीडितेने सीडी महत्त्वाचा पुरावा म्हणून न्यायालयात सादर केली. आरोपानुसार, माजी खासदारानं घरकाम करणाऱ्या महिलेवर दोनदा बलात्कार केला होता. पीडितेने या घटनेचा व्हिडिओ रेकॉर्ड केला होता आणि तीच सीडी पुरावा म्हणून ठेवली होती. फॉरेन्सिक तपासात सीडीवर शुक्राणूंचे ठसे आढळल्याने (पान २ वर)

### नवी कोरी पुस्तकं




**मृगपक्षी**
: लेखकाचे नाव :
**बाबासाहेब सौदागर**
किंमत रु. : २२०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**



**उद्ध्वस्त वर्तमानाच्या दाहीदिशा**
: लेखकाचे नाव :
**संजय कृष्णाजी पाटील**
किंमत रु. : ३३०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# 'रमी' फेम कोकाटे आता क्रीडामंत्री !



**मुंबई :** विधिमंडळात रमी खेळणारे माणिकराव कोकाटे यांची अखेर कृषीमत्रिपदावरून उचलबांगडी झाली. माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषिखात्याचा कारभार काढून घेण्यात आलं आहे. माणिकराव कोकाटेंकडे आता दत्तात्रय भरणे यांच्याकडे असलेला क्रीडा आणि युवक कल्याण खात्याचा पदभार देण्यात आलाय, तर दत्तात्रय भरणे आता नवे कृषीमंत्री असणार आहेत.

## दत्तात्रय भरणे नवे कृषिमंत्री

खातेपालटावर विरोधी पक्ष टीका करत असले तरी अजित पवारांनी एका दगडात दोन पक्षी मारलेत. क्रीडा आणि युवक खातं मिळाल्याने अजितदादांचे विश्वासू असलेलेल दत्तात्रय भरणे हे नाराज असल्याची चर्चा होती. दत्तात्रय भरणेंनी खातेवाटपानंतर ही नाराजी उघडही केली होती. मात्र आता कोकाटेंवरील कारवाई ही दत्तात्रय भरणेंसाठी एक लॉटरी ठरलीय. कृषिखात्यासारख्या महत्त्वाच्या खात्यावरील वर्षी ही भरणेंसाठी लॉटरीच मानली जातेय. एकीकडे कोकाटेंचा खातेपालट करत अजित पवारांनी कारवाई केल्याच दाखवलंय, तर दुसरीकडे विश्वासू दत्तामामा भरणेना कृषिखातं देत अजित पवारांनी एका दगडात दोन पक्षा मारल्याची चर्चा रंगली आहे.

महाराष्ट्र शासनाला 'भिकारी' म्हणून राज्याची प्रतिष्ठा धुळीस मिळविणाऱ्या मंत्रीमहोदयाना नारळ देण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री (पान २ वर)

# पाकिस्तान अस्वस्थ, पण वेदना काँग्रेस आणि सपाला

**वाराणसी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीतील एका कार्यक्रमात पाकिस्तानवर संताप व्यक्त केला. यावेळी त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख केला आहे आणि बदला घेण्याचे त्यांचे वचन पूर्ण केल्याचे म्हटले आहे. पंतप्रधानांनी यावेळी यावर भर दिला की, ऑपरेशन सिंदूर पूर्णपणे यशस्वी झाले आहे, पहलगामचे गुन्हेगार देखील मारले गेले आहेत. याचबरोबर त्यांनी पाकिस्तानसह काँग्रेस



आणि समाजवादी पक्षावरही टीका केली.

पाकिस्तान, काँग्रेस आणि समाजवादी पक्षावर टीका करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, ''पाकिस्तान अस्वस्थ आहे, हे सर्वांनाच माहिती आहे. पण काँग्रेस आणि समाजवादी पक्ष पाकिस्तानच्या वेदना सहन करू शकत नाहीत. तिकडे पाकिस्तान रडत आहे आणि इथे काँग्रेस व समाजवादी पक्ष दहशतवाद्यांची अवस्था पाहून रडत आहेत. काँग्रेस सतत आपल्या सैन्याच्या शौर्याचा अपमान करत आहे. काँग्रेसने ऑपरेशन सिंदूरला तमाशा म्हटले आहे.''

समाजवादी पक्षावर टीका करताना (पान २ वर)

### संक्षिप्त

## अजित पवार आम्हाला विश्वासात घेत नाही

**पुणे ।** अजित पवारांच्या विकास कामांना आमचा विरोध नाही, परंतु ते आम्हाला विचारात घेऊन काम करत नाहीत, असा थेट आरोप त्यांनी अजित पवार यांच्यावर केला असून केवळ ते आयटीयन्स यांचं ऐकतात, आम्हाला बैठकीला बोलावलं जात नाही, मुळात हिंजवडी गावच्या समस्या नसताना नाव हिंजवडीच खराब होत आहे, गावकऱ्यांचं म्हणणं ऐकून घ्यावं अनेक मंदिर, शाळा, घरे रोडमध्ये जाणार आहेत, त्यामुळे अजित पवारांना सरपंच गणेश जांभुळकर यांनी हात जोडून विनंती केली आहे, की यापुढे तरी आम्हाला विश्वासात घेऊन हिंजवडीतील कामे करावीत.

# अर्बन नक्षलसारखे वागाल तर तुमची अटक होईल

## देवेंद्र फडणवीसांचा ठाकरेंना टोला


**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रायगडमधील आपल्या भाषणात शेकापचे नेते जयंत पाटील यांचं कौतुक करताना येथील शेतकरी व कामगारांना मोलाचा सल्ला दिला. तसेच, येथील उद्योग उभारणीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात आहेत, अन् अमराठी कामगारांना नोकरी दिली जात असल्याचं त्यांनी म्हटलं. दरम्यान, राज ठाकरेंनी शासनाच्या धोरणावर टीका करताना जनसुरक्षा कायद्यावरुन टोलाही लगावला. आता काय तो कायदा आणला म्हणे, अर्बन नक्षल म्हणून (पान २ वर)

## मंत्र्यांचे फोन टॅप होत आहेत : पवार

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे फोन टॅप होत असल्याची चर्चा असल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यांनी आपल्या एक्स अकाउंटवर पोस्ट केली आहे. ''काही मंत्र्यांचे फोन बऱ्याचदा नॉट रिचेबल येत असून आपले फोन टॅप होत असल्याने मंत्री स्वतःहूनच फोन बंद ठेवततात, अशी चर्चा दबक्या आवाजात सुरुय असेही ते म्हणाले.

# महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका : राज ठाकरे

**पनवेल :** विकत घेता येणारी माणसे अशी प्रतिमा आपली महाराष्ट्राबाहेर उभी करण्यात येत आहे. मराठी माणसं विकाऊ आहे असं सांगितले जाते त्याची लाज वाटते. महाराष्ट्रात आपण आपली भाषा विसरतोय, आपली तत्वे घालवतोय, जमिनी घालवतोय. स्वाभिमानी माणसे विकली गेली तर जिवंत प्रेते उरतात. देशाला दिशा देणारा हा महाराष्ट्र आहे.



तुम्ही मोठे झाले पाहिजे, पण महाराष्ट्र विकून नाही. इतरांच्या आहारी जाऊन जमिनी देऊन टाकायच्या, बाहेरची माणसे येतायेत. जागे राहा, सतर्क राहा, महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका अशी कळकळीचं आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी जनतेला केले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या (पान २ वर)

> **जनसुरक्षा कायद्यावर ठाकरेंची टीका**
>
> आता सरकारने कायदा आणला आहे जो आंदोलन करेल तो अर्बन नक्षल... एखाद्या प्रकल्पाला तुम्ही विरोध केला तर सरकार तुम्हाला अटक करू शकते. अटक करूनच पाहा, मराठी माणसञ्च्या थडग्यावर उद्योग उभे राहू देणार नाही. उद्योग आणायचे असतील तर मराठी माणसांना त्यात सामावून घ्यावे लागेल असं सांगत राज ठाकरे यांनी जनसुरक्षा कायद्यावर टीकास्त्र सोडले.

# नितीन गडकरींच्या उंचीची व्यक्ती आम्हाला दिसत नाही

## शरद पवारांकडून दिल्लीत कौतूक; गडकरींना सीडी देशमुख पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली :** संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू असून केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांना राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आणि खासदार शरद पवार यांच्या हस्ते चिंतामणराव देशमुख पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात शरद पवारांनी नितीन गडकरी यांच्या कामाचे कौतुक करत, त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहेत. तसेच, त्यांच्या कामाबद्दल नेहमीच इतर खासदार कौतुक




करतात, चांगलं सांगतात असेही पवारांनी म्हटले. राजधानीत ज्यांनी कर्तुत्व गाजवलं त्यांच्यावर पुस्तक लिहिण्यात येत आहे. दुसऱ्या बाजूला सी.डी देशमुख यांच्या नावाने पुरस्कार दिला जात असून नितीन गडकरींना हा पुरस्कार आहे, याचा आनंद झाला, असे शरद पवारांनी म्हटले. गडकरींचे काम फक्त महाराष्ट्रापुरते आहे असं म्हणणं खरं नाही, गडकरींच्या उंचीची व्यक्ती आम्हाला दिसत नाही, अशा शब्दात शरद पवारांनी गडकरी यांच्याबद्दल प्रतिपादन व्यक्त केलं.

कोणत्याही खासदाराला प्रश्न विचारला तरी ते नितीन गडकरी यांच्याबद्दल चांगलंच बोलतात, त्यांच्या कामाचे कौतुक होते. गडकरींच्या कामाबद्दल ७० टक्के खासदार आम्हाला सांगतात, गडकरींच्या कामाबद्दल खासदारांना प्रखंड विश्वास आहे. त्यामुळेच, गडकरींच्या उंचीचा व्यक्ती आम्हाला दिसत नाही, असे म्हणत शरद पवारांनी नितीन गडकरींवर स्तुतीसुमने उधळली आहेत.

शरद पवारांनी पुढे बोलताना म्हटाने की, स्वातंत्र्याच्या (पान २ वर)

> **मराठीचा मला अभिमान : गडकरी**
>
> सी.डी. देशमुख यांच्या नावाचा पुरस्कार स्विकारण्याची माझी पात्रता आहे का माहिती नाही, असे म्हणत नितीन गडकरी यांनी पुरस्कार स्वीकारला. तसेच, काळाच्या ओघात आपण अनेक गोष्टी विसरतो, विस्मृती माणसाला मिळालेली देणगी आहे. मराठीचा आम्हाला अभिमान आहे. हिंदीचाही तितकाच अभिमान आहे, असे गडकरींनी भाषणावेळी म्हटले.

# मालेगाव स्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

**मुंबई:** मालेगाव स्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. केवळ संशयाच्या आधारावर आरोपीना दोषी ठरवू शकत नाही. त्यामुळे सगळ्या आरोपीची निर्दोष सुटका करण्यात येत आहे, असं एनआयएच्या विशेष न्यायालयाकडून सांगण्यात आले. १००० पानांहून अधिक पानांचा निकाल असल्याचं न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले. मालेगावमध्ये २९ सप्टेंबवा २००८ साली झालेल्या भीषण बॉम्बस्फोट प्रकरणी न्यायालयाने गुरुवारी (३९ जुलै) निकाल सुनायाम्यात आला.

भिक्खू चौकात झालेल्या या स्फोटात निरपराध नागरिकांचे प्राण गेल, तर १०० हुन अधिक जण गंभीर जखमी झाले होते. बॉम्बस्फोटाच्या या घटनेनंतर अनेक कुटुंब उध्वस्त झाली होती. आता, तब्बल १७ वर्षानंतर या प्रकरणाचा निकाल (पान २ वर)

# पाण्याचे संघर्ष संपवण्यासाठी प्रयत्न : मंत्री राधाकृष्ण विखे

## जायकवाडी धरणातून पाणी सोण्याच्या आनंददायी क्षणाची घेतली अनुभती

**छत्रपती संभाजीनगर** : भविष्यात पाण्याचे संघर्ष आपल्याला संपवायाचे आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प महायुती सरकारने केला आहे. आता उल्हास खोऱ्यातील पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासाठी महायुती सरकारने आरखडा तयार केला असून त्यावर काम सुरू झाले आहे. केवळ सव्र्हे क्षणासाठी ६० हजार कोटी रुपयांच्या निधीची तरदूत केली असून नदीजोड प्रकल्पाचे कार्यालय नाशिक येथे सुरू होत आहे. डॉ. बाळासाहेब विखे पाटील आणि डॉ. गणपतराव देशमुख या दोघांचे स्वप्न पूर्ण करण्याचे दायित्व आपल्यावर सोपविले असल्याने ते पूर्ण करण्याची जबाबदारी मंत्री म्हणून घेतली असल्याची ग्वाही जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील वांनी दिली.

नाथसागर प्रकल्पाच्या पायाभरणीपासून ते ज्ञानेश्वर उद्यानाच्या निर्मीतीची वाटचाल, पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने धरणाबर झालेला सत्कार, या धरणाच्या निर्मितीत बहिणीला विस्थापीत व्हावे लागल्याच्या आठवणींना उजाळा देत मंत्री विखे यांनी जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याचा आनंदादायी क्षण अनुभवला. त्यावेळी ते बोलत होते. अनेक वर्षाच्या कालखंडानंतर नाथसागर भरल्या आनंद मंत्री विखे यांनी जलपूजन करून व्यक्त केला. धरणावर जाऊन त्यांनी नाथसागराची खणा नारळाने ओटी भरून गोदामातेची आरती केली. सायरन वाजवून पाणी सोडण्याची औपचारिक प्रक्रीया पूर्ण केली. मराठावाड्याला जेवढा आनंद झाला तेवढाच तो अहिल्यानगरलासुध्दा आहे असे सांगून कधी काळी या धरणाच्या पाण्यावरून वादाचे प्रसंग आले. पण सर्व गोष्टींना निसर्ग हेच उतर असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की, स्व. शंकरराव चव्हाण यांनी अतिशय दूरदृष्टीतून या प्रकल्पाची उभारणी केली. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या हस्ते भूमीपूजन झाल्याच्या ऐतिहासिक आठवणी मनामध्ये घर करून असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी आ. हिकमत उढाण, आ. विजयसिंह पंडीत, आ. रमेश बोरनारे, आ. विठ्ठलराव लंघे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,



मुख्य अभियंता अरूण नाईक, सुनंदा जगताप, मुख्य अभियंता राजीव मुंदडा, सभापती राजू भुमरे, नाथ संस्थानचे विश्वस्त दादा बान्हे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी उपस्थित होते.

या धरणामध्ये माझ्या बहिणीला विस्थापीत व्हावे लागल्यानंतर खिर्डी गावाला भेट देण्याच्या प्रसंगाचे वर्णन सांगून, धुळे येथे महाविद्यालयात शिक्षण घेत होतो तेव्हा सायकलवर नाथसागर पाहायला कसे आलो आणि जाताना बसवर सायकली टाकून कशा नेल्याच्यी आठवण त्यांनी जागवली. पंतप्रधान इंदिरा गांधी या ठिकाणी आल्या तेव्हा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचा अमृतमहोत्सवी सत्कार झाला. मुख्यमंत्री असलेले स्व. शंकरराव चव्हाण आणि तेव्हाचे पाटबंधारे मंत्री बी. जे. खताळ यांच्यासह अनेकांच्या असलेल्या उपस्थितीलाही त्यांनी उजाळा दिला.

राज्यातील धरणातून गाळ काढण्यासाठी स्वतंत्र धोरण घेण्यात येणार असून यामुळे पाण्याची पातळी वाढण्यास तसेच बँकवॉटरचा फायदा अहिल्यानगरमधील तालुक्यांना होईल. पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाण्याचा प्राधान्यक्रम कायम ठेवून यंदाच्या वर्षी आवर्तनाचे नियोजन झाले. त्या फायदा झाल्याकडे त्यानी सांगितले.


## भूपेंद्रच्या हलगर्जीपणामुळेच ग्रोमोर बुडाली

**शिर्डी** : ग्रोमोर इन्वेस्टमेंट अँड फायनान्समध्ये गुंतवणूकदारांचे पैसे बुडवलेचा आरोपी भूपेंद्र सावळे याने शेअर मार्केटमधे केलेली चुकीची गुंतवणूक व हलगर्जीपणामुळे किंवा नाकतें पणामुळे ग्रोमोर खड्ड्यात गेत्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे. तशी कबुलीशी भूपेंद्रने पोलिसांना दिली आहे. काल त्याला एम पी आय डी राहाता कोर्टात मागील कस्टडी संपल्याने कोर्टात करण्यात आले होते राहाता पोलीस ठाण्यात त्याचेवर असलेल्या गुन्ह्यात पहिली कस्टडी १६ जुलै रोजी देण्यात आली होती. दहा दिवसांची कस्टडी मिळाल्यानंतर त्याची कस्टडीची मुदत संपल्यानंतर त्यास एमपीआयडी कोर्टात राहाता येते पुन्हा हजर करण्यात आले होते यावेळी आरोपीचे वकिल डवोकेट सुरेश हुमळे व तपासी अधिकाऱ्यांमधे जोरदार युक्तिवाद करण्यात आला. पोलीसांनी आमच्या तपासात प्रगती असून आम्हाला पुढील तपास करण्यासाठी कस्टडी वाढवून मिळावी अशी माननीय कोर्टात विनंती केली. यामध्ये त्यांनी अनेक उलगडे केले असून त्याने ज्या ज्या बँक खात्यामध्ये पैसे गुंतवले त्याचा सविस्तर अहवाल घेणे बाकी आहे.

## तनपुरे कारखाना सुरु करण्यास हिरवा कंदील, पण...

### बाजार समितीच्या शेतकरी भवन व उपहारगृहाचे उपमुख्यमंत्री पवारांच्या हस्ते लोकार्पण

**राहुरी** : डॉ. तनपुरे साखर कारखाना सुरू करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राहुरीकरांना निराश न करता कारखाना सुरू करण्यास हिरवा कंदील दाखवला. मात्र आता सगळ्यांनाच डोळ्यात तेल काम करावे लागणार आहे. घेतलेल्या कर्जाचे हफ्ते वेळेवर भरावे लागतील. कृषी



उत्पन्न बाजार समितीने नव्याने बांधलेल्या शेतकरी भवन व उपाहारगृहाच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते काल झाला, यावेळी ते बोलत होते.

### बटन दाबायला अजित आला नव्हता

कारखान्याच्या अधोगतीला आपणही जबाबदार आहे. आपल्यापण काही चुका आहेत. सभासदांनी योग्य संचालक मंडळ निवडून द्यायला पाहिजे होते. त्यावेळी बटन दाबायला काय अजित पवार आला नव्हता. तुम्ही वेगवेगळ्या लोकांना निवडून दिले. परत कारखान्याकडे बघितलेसुद्धा नाही. अरे ज्याचं जळतं त्यालाच कळतं. तुमच्या कारखान्याला २४ गाड्या व २४ ड्रायव्हर होते. पेट्रोल-डिझेल फुल भरून देवदर्शन, लग्नकार्य, लग्न जुळवाजुळवी हे मी डोळ्यांनी पाहिले आहे.

पान १ वरून

### बलात्कार प्रकरणात माजी खासदार रेवण्णा दोषी

खटला मजबूत झाला. भारतीय दंड संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांखाली रेवण्णाविरुद्ध आरोप निश्चित झाले. न्यायालय आता उद्या अंतिम शिक्षा ठरवणार आहे. म्हैसूरमधील केआर नगर येथील घरकाम करणाऱ्या महिलेच्या तक्रारीनंतर सीआयडीच्या सायबर क्राइम पोलिसांनी प्रकरण नोंदवले. तपास पथकाने २००० पानांचे आरोपपत्र दाखल केले असून १२३ पुरावे गोळा केले. या प्रकरणात २३ साक्षीदारांच्या जबाबांची नोंद झाली.

३१ डिसेंबर २०२४ रोजी सुनावणी सुरू झाली आणि अवघ्या सात महिन्यांत खटला पूर्ण झाला. न्यायालयाने व्हिडिओ क्लिप्स, फॉरेन्सिक अहवाल आणि घटनास्थळाच्या तपासणी अहवालांचा अभ्यास करून निर्णय दिला. विशेष न्यायाधीश संतोष गजानन भट्ट यांनी आज दोषी ठरवून निकाल राखून ठेवला असून, उद्या शिक्षेची घोषणा होणार आहे.

### 'रमी' फेम कोकाटे आता क्रीडामंत्री !

महोदयांनीच पुढाकार घ्यायला पाहिजे. विधिमंडळात रमी खेळल्याचे बक्षीस म्हणून त्यांना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रीपद देण्याचा निर्णय खरोखरच अनाकलनीय आहे. या सरकारचे प्राधान्यक्रम काय आहेत याची चिरफाड यामुळे झाली. एकिकडे राज्यातील तरुण पिढी ऑनलाईन रमीच्या मागे लागून बरबाद होत आहे. तिच्याबर बंदी घालण्याची मागणी होत असताना माणिकराव कोकाटे यांना विधिमंडळात रमी खेळल्याचे बक्षीस माणून क्रीडा व युवक कल्याण यासारखे महत्वाचे खाते दिले जाते यासारखा दुसरा क्रूर बिनोद नाही. मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की कृपया आपण माणिकराव कोकाटे याचा राजीनामा घेऊन राज्याची प्रतिष्ठा जपण्याचे काम करावे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

जो निर्णय घेतला आहे, तो मला मान्य आहे, तसेच दत्तात्रय भरणेंना काही मदत लागली मी नक्की करेन आणि त्यांची मला मदत लागल्यास मी घेईन, अशी प्रतिक्रिया क्रीडामंत्री पद स्वीकारल्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी दिली. नबीन खातं आवडलं का?, असं विचारताच 'आय म व्हेरी हैप्पी', असं ते म्हणाले.

राज्यातील कृषी क्षेत्र पुर्णपणे कोलमडून पडलेले असताना विधिमंडळात बसून रमी खेळणारे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर किती संवेदनशील असतील? याहून कहर म्हणजे या कृषीमंत्र्यांचे केवळ खाते बदलून अभय देणारे सत्ताधारी किती गंभीर असतील ? याची शंका आल्याशिवाय राहत नाही. आपले पद आणि जबाबदारी यांची किंचितही जाणीव नसणारी व्यक्ती मंत्रीमंडळात आहे याची खरंतर राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना खंत वाटली पाहिजे.

### पाकिस्तान अस्वस्थ, पण वेदना काँग्रेस आणि सपाला

पंतप्रधान मोदी म्हणाले की, ''वोटबँक आणि तुष्टीकरणाच्या या राजकारणात समाजवादी पक्षही मागे नाही. त्यांचे नेते प्रश्न विचारत होते की, या विशिष्ट दिवशीच पहलगाम दहशतवादी का मारले गेले? कोणतीही कारवाई करण्यापूर्वी मी त्यांना फोन करून विचारायचे का? सामान्य ज्ञान असलेल्या कोणालाही उत्तर देता येईल की, दहशतवाद्यांना मारण्यासाठी आपण वाट पाहण्याची गरज आहे का? आपण त्यांना पळून जाण्याची संधी दिली पाहिजे होती का? हे तेच लोक आहेत, जे सत्तेत असताना दहशतवाद्यांना क्लीन चिट देत असत आणि आता दहशतवादी मारले गेल्यावर ते नाराज होत आहेत. त्यांना सिंदूर या ऑपरेशनच्या नावाची समस्या आहे.'' पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज मी ऑपरेशन सिंदूर नंतर पहिल्यांदाच काशीला आलो आहे. जेव्हा २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता, तेव्हा २६ निष्पाप लोक इतक्या क्रूरपणे मारले गेले होते. माझे हृदय वेदनेने भरले होते. तेव्हा मी बाबा विश्वनाथांना प्रार्थना करत होतो की, त्यांनी सर्व पीडित कुटुंबांना हे दुःख सहन करण्याची हिंमत द्यावी. माझ्या मुलींच्या सिंदूरचा बदला घेण्याचे मी जे वचन दिले होते ते देखील पूर्ण झाले आहे. हे केवळ महादेवाच्या आशीर्वादाने शक्य झाले आहे.''

### अर्बन नक्षलसारखे वागाल तर तुमची अटक होईल

अटक करणार, पण अटक करुनच दाखवा, असे चॅलेंजच राज ठाकरेंनी दिले. त्यावर, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिलं आहे. तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागाल तर तुमची अटक होईल, असे फडणवीसांनी म्हटले. राज ठाकरेंनी जनसुरक्षा कायद्यावरुन केलेल्या टीकेसंदर्भात मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. तुम्ही कार्यकर्त्यांना अटक करुन दाखवाच? असं राज ठाकरे म्हणाले. त्यावर, मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलंय. त्यांच्याकरिता हा कायदा बनलाच नाही, तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागाल तर तुमची अटक होईल, तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागत नाही तर तुमची अटक करण्याचे कारण नाही, असे म्हणत राज ठाकरेंच्या टीकेला देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले. तसेच, जे लोक कायद्याच्या विरोधात, त्यांच्याकरिता तो कायदा आहे, आंदोलकांच्या विरोधात हा कायदा नाही. सरकारच्या विरोधात बोलण्याची मुभा आहे, त्यामुळे मला असं वाटतं ज्या कमेंट्स आहेत ते कायदा न वाचता केलेल्या कमेंट्स आहेत, असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी राज ठाकरेंना लगावला.

### महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका : राज ठाकरे

वर्धापन दिनी राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यापुढे उद्योगधंद्यासाठी, जमिनीसाठी लोक आले तर जमिनी नुसत्या विकायच्या नाहीत तर तुमच्या कंपन्यांमध्ये पार्टनर म्हणून घ्या असं सांगायचे. आपण या गोष्टी वाचवायला नाहीत तर यापुढे रायगडमध्ये अमराठी नगरसेवक, आमदार, खासदार निवडून येतील. अख्खा ठाणे जिल्ह्याला हा विळखा पडला आहे. सगळ्या पक्षांनी येऊन याचा विचार केला पाहिजे. नवी मुंबई विमानतळावर १०० टक्के मराठी मुले कामाला लागली पाहिजेत. बाहेरून येऊन जमिनी विकत घेणार आणि वाटेल तसं थैमान घालणार हे चालणार नाही. शेकापच्या व्यासपीठावर मी दुसऱ्यांदा येतोय. पक्षाचा विचार न करता मराठीचा मुद्दा समजून घेतला पाहिजे. जेव्हा जेव्हा चांगले रस्ते आले आहेत तेव्हा राज्य सरकारचे लक्ष नसेल तर तो प्रदेश बर्बाद व्हायला वेळ लागत नाही. महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री महाराष्ट्रात लहान मुलांना हिंदी कशी आणता येईल, शिकवता येईल याचा विचार करतोय. महाराष्ट्रात कामधंदा करायला जे येतायेत त्यांना मराठी कशी येईल याचा विचार करत नाही. महाराष्ट्रातला मराठी माणूस, भूमिपूत्र याचा विचारच राज्य सरकारला नाही. याचे भीषण वास्तव रायगड जिल्ह्यात आहे. रायगडातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी चालल्या आहेत. कुठे चालल्यात माहिती नाही. जमिनीचे व्यवहार करणारे आपलेच, कुंपनच शेत खातायेत. उद्योगधंदे इथे येतायेत आणि लोक बाहेरून आणले जातील. शेतकरी आणि कामगार दोन्ही उद्ध्वस्त होतोय. रायगड जिल्ह्याची जबाबदारी जयंत पाटील यांनी हाती घेतली पाहिजे. इथला मराठी माणूस, इथला शेतकरी, उद्योगधंदे यावर मराठी माणसाने लक्ष ठेवणे गरजेचे आहे असं त्यांनी सांगितले.

दरम्यान, आज सर्वाधिक डान्सबार रायगड जिल्ह्यात कसे?, रायगड जिल्हा ही शिवछत्रपतींची राजधानी आहे. कल्याणच्या सुभेदाराची सून खणानारळाने ओटी भरणाऱ्या आपल्या राजा शिवछत्रपतींची राजधानी इथे आहे तिथे डान्सबार सुरू आहे. महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य संमेलन भरवतंय, हे नुसते गुजराती माणसाबद्दल प्रेम नाही. त्यातून मराठी माणूस आणि गुजराती माणसांमध्ये भांडण लावावी यासाठी केलेले हे उद्योग आहे. तुम्हाला हवे ते आम्ही करणार नाही परंतु ज्यावेळी समजेल तुमच्या कृतीतून महाराष्ट्राला नख लागतंय त्यावेळी अंगावर येऊ. कान बंद ठेवू नका, डोळे बंद ठेवू नका. आपल्या आजूबाजूला काय सुरू आहे त्यावर बारीक लक्ष ठेवले पाहिजे. तुम्ही विकले जातायेत, पायाखालची जमीन निसटतेय. भाषा जातेय मग कालांतराने डोक्यावर पश्चातापाचा हात मारावा लागेल. तुमच्या प्रत्येकाकडे पैसे आले पाहिजे. कुटुंब उभी राहिली पाहिजे पण महाराष्ट्र विकून नाही असंही राज ठाकरे यांनी सांगितले.

### नितीन गडकरींच्या उंचीची व्यक्ती आम्हाला दिसत नाही

पूर्वी मंत्रिमंडळात बाबासाहेब, सी.डी. देशमुख अशी मोठी माणसे होती, त्यांच्या नियोजनामुके अनेक दूरगामी परिणाम झाले आहेत, दक्षिणेतील अनेक राज्यांना आज वीज मिळते, करन्सी हा त्यांचा आवडीचा विषय होता. संयुक्त महाराष्ट्राच्यासाठी संघर्ष झाला. त्यात लोक हुतात्मा झाले. त्यावेळी, त्यांनी नेहरूना स्पष्ट सांगून राजीनामा दिला होता. स्वातंत्र्याच्या नंतर देशाच्या लोकसभेचे पहिले अध्यक्ष मावळणकर यांची निवड झाली होती. जेव्हा देशावर आक्रमण झालं तेव्हा यशवंतराव चव्हाण देशाचे संरक्षण मंत्री झाले. तर. काकासाहेब गाडगीळ यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत योगदान दिले आहे. सन १९६७ मध्ये विधानसभेला मी उभा राहिलो, माझ्या लोकसभेचे उमेदवार खाडिलकर होते, त्यांनी मी एकत्र काम केलं. कोकण रेल्वेचा निर्णय मधू दंडवते यांनी घेतला. ती खाली केरळ पर्यंत जाते, अशा आठवणींना शरद पवारांनी या पुरस्कार सोहळ्यातून उजाळा दिला.

मुंबईच्या एनआयए वा विशेष न्यायालयात आज निकाल सुनावण्यात आला. निदों प सुटका होताच आरोपींनी न्यायालयाचे आभार मानले. आज आम्हाला खऱ्या अर्थान न्याय मिळाला, असं म्हणत आरोपी भावूक झाले.

बॉम्ब ब्लास्ट झाल्याचं सरकारी पक्षानं सिद्ध केलं. पण ब्लास्ट स्कूटरमध्ये झाला हे सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरत्याच न्यायालयाने सांगितलं. तपासात अनेक त्रुटी होत्या. या सगळ्या त्रुटीचं वाचन देखील न्यायालयात करण्यात आले. पंचनामा योग्य नव्हता. जागेवरून हातांचे ठसे जप्त करण्यात आले नाही, असं निरिक्षणही न्यायालयाने नोंदवलं. चेसीस नंबर दुचाकीचा देखील कधी रिकव्हर करण्यात आला नाही. साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर दुचाकीची मालक होती हे देखील स्पष्ट नाही, असं न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले. बैठकांसंदर्भातही तपास यंत्रणेचे दाव्यांवर न्यायालयाचं समाधान झालं नाही. आधी लावलेला मोक्कानंतर मागे घेतल्याने याअंतर्गत सगळे जबाब निरर्थक असल्याचं न्यायालयाने सांगितलं. युएपीए साठी घेण्यात आलेली मान्यता चुकीची आहे. त्यामुळे युएपीए लागू होत नाही. लष्करी अधिकारी असलेल्या कर्नल प्रसाद पुरोहित यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी घेण्यात आलेल्या मान्यतेवरदेखील न्यायालयाकडून सवाल उपस्थित करण्यात आले. आरडीएक्स कर्नल प्रसाद पुरोहितांनी आणलं याचा पुरावा नाही, असंही न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले. सगळ्या आरोपींना संशयाचा फायदा बेनिफिट ऑफ डाऊट आहे. केवळ संशयाच्या आधारावर आरोपीना दोषी ठरवू शकत नाही. त्यामुळे सगळ्या आरोपींची निर्दोष सुटका करण्यात येत आहे, असं न्यायालयाकडून सांगण्यात आले. मप्ता जेव्हा पहिल्यांदा चौकशीला बोलावलं होतं तेव्हा मी माणुसकीच्या नात्याने न्यायचा सन्मान करून मी आले होते. १३ दिवस मला टॉर्चर करण्यात आलं. माझं आयुष उध्वस्त केलं. मी १७ वर्ष अपमानित झाले. मला स्वतःच्याच देशात आतंकवादी बनवलं, ज्यांनी मला हे दिवस आणले त्याबद्दल मी काही बोलू शकत नाही. संन्यासी आहे म्हणून मी जिवंत आहे. मला ऐकल्याबद्दल मला समजून घेतल्या बद्दल आभार... भगव्याला आंतकवादी म्हटले. भगण्याचा विजय झाला हिंदुत्वाचा विजय झाला. ज्यांनी हिंदुत्वाला आतंकवादाच नाव दिल त्यांना कधी माफ केलं जाणार नाही, असे प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी म्हटले आहे. विशेष एनआयए न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी यावेळी दहशतवादाचा कुठलाही धर्म नाही, कुठलाही रंग नाही, अशी टिप्पणी केली. विशेष म्हणजे मालेगाव स्फोटापासून दहशतवादाच्या रंगावरून सातत्याने वार पलटवार होत राहिला आहे. दुसरीकडे, एनआयए न्यायालयाने म्हटले की, मालेगावमध्ये स्फोट झाल्याचे सरकारी वकिलांनी सिद्ध केलं, पण बाईकमध्ये बॉम्ब ठेवल्याचे सिद्ध करण्यात अपयशी ठरले. जखमींची संख्या १०१ नाही तर ९५ होती. काही वैद्यकीय प्रमाणपत्रांमध्ये फेरफार करण्यात आल्याचा आरोपही न्यायालयात केला असून त्याच्या सखो चौकशीचे आदेश

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूरकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |


| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |
| **कृषि विषयक पुस्तके** | | |
| **डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील** | | |
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७१० |
| वाईन उद्योग | | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | | रु. २००० |
| अक्षय उर्जा | | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# पहलगाम हल्ल्यातील तीन दहशतवाद्यांचा खात्मा

## ऑपरेशन महादेव : पहलगाम हल्ल्याचा बदला



**नवी दिल्ली :** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. या भ्याड हलुयातः एकूण २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. आता जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हळ्याच्या ९७ दिवसांनंतर अखेर भारतीय सैन्याला मोठे यश मिळाले आहे. ऑपरेशन महादेव अंतर्गत भारतीय सैन्याने प्रत्युत्तरात्मक कारवाई करत तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. ही चकमक सोमवारी श्रीनगरमधील लिडवास परिसरात झाली. याबाबत चिनार कॉप्सने माहिती दिली असून, ही कारवाई हलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी नेटवर्कविरोधात करण्यात आल्याचे सांगितले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सुलेमान, यासिर आणि अली या तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांचे मृतदेह मिळाले आहेत. त्यापैकी सुलेमान आणि यासिर हे पहलगाम हल्ल्यात सामील होते, अशी माहिती समोर आली आहे. श्रीनगरमधील दाचिगाम राष्ट्रीय उद्यानाजवळील हरवन परिसरात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक सुरू झाल्याची माहिती लष्कराने दुपारी १२:३० वाजता दिली. लष्कराच्याः चिनार कॉप्सन माहिती दिली की, ऑपरेशन महादेव जनरल एरिया लिडवास मध्ये संपर्क स्थापित झाला आहे. दुपारी १:३० वाजता लष्कराने सांगितले की तीन दहशतवादी मारले गेले आहेत.

चकमकी नंतर दहशतवाद्यांकडून अमेरिकन एम ४ कार्बाइन, एके ४७ रायफल, १७ रायफल ग्रेनेड आणि इतर संशयास्पद सामग्री जप्त करण्यात आली आहे. ऑपरेशननंतर परिसरात लष्कर आणि सुरक्षा दलांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुप्त माहितीच्या आधारे सकाळी शोधमोहीम सुरू करण्यात आली होती. यादरम्यान दोन वेळा गोळीबाराचा आवाज आला, त्यानंतर सुरक्षादलांनी परिसराला पूर्ण वेढा घालून दहशतवाद्यांचा खात्मा केला. २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या या हल्लूयाने संपूर्ण देश हादरला होता. पहलगामपासून सुमारे ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या बैसरन घाटीमध्ये तीन दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अचानक हल्ला चढवला. दहशतवाद्यांनी लोकांची धार्मिक ओळख विचारून पर्यटकांना लक्ष्य केले होते.

# बाजारात बनावट नोटा खपवण्याचा प्रयत्न फसला

**अहिल्यानगर :** बनावट पाचशे रुपयांच्या नोटा बाजारात खपवण्यासाठी घेऊन येणाऱ्या दोघांना नगर तालुका पोलिसांनी रविवारी रात्री सापळा रचून अटक केली. या कारवाईत एकूण १७लाख ३७ हजार ८७० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला असून बनावट नोटांचा मोठा साठा, वाहन व मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सोमनाथ माणिक शिंदे (वय २५, रा. तपोवन रस्ता, अहिल्यानगर) व निखिल शिबाजी गांगर्डे (वय २७, रा. कोंभळी, ता. कर्जत) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडून ५०० रुपयांच्या एकूण १६० बनावट नोटा, ३ मोबाईल फोन, चारचाकी वाहन (एमएच १६ डीएल २७९७), तसेच २१७० रुपयांच्या मूळ चलनाच्या नोटा हस्तगत करण्यात आल्या.

नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

# महाराष्ट्र कुस्तीगिर परिषदेच्या अध्यक्षपदी ‘रोहित’

## संधीचं सोनं करणार, कुस्तीला गतवैभव मिळवून देणार : पवार



**कर्जत :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कर्जत जामखेड मतदार संघांचे आमदार रोहित पवार यांची बिनविरोध निवड झाली. त्यांच्यासह सचिवपदी विजय बराटे आणि इतर पदाधिकाऱ्यांही निवड बिनविरोध करण्यात आली आहे.

आतापर्यंत प्रत्येक मैदानात केलेल्या चांगल्या कामगिरीची ही पोचपावती असून या संधीचं सोनं करणार, कुस्तीला गतवैभव मिळवून देणार असल्याचं रोहित पवारांनी म्हटलंय. पैलवानांना त्यांच्या हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करून देणं, त्यांना आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा मिळवून देणं आणि मातीतल्या या खेळाला आभाळाइतकं मोठं करण्याचा निश्चितच प्रामाणिक प्रयत्न करणार असं रोहित पवार म्हणाले. निवडणूक असो वा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, प्रत्येक ठिकाणी चांगलं काम केल्याची पोचपावती मिळाल्याची भावना रोहित पवारांनी व्यक्त केली.

# ४७ लाखांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**अहिल्यानगर :** शेअर ट्रेडिंगमध्ये अधिक नफा मिळवून देतो, असे आमिष दाखवून ४७ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या चार भामट्यांना अहिल्यानगर सायबर पोलिसांनी अटक केली आहे.

जावेदभाई मोहम्मदभाई सुमारा (४० वर्षे) रा. काजली, ता. वेरावल, जि. गिर सोमनाथ, गुजरात, जिग्रेश मोहनभाई कलसरिया (२७ वर्षे), महादेव जसुभाई गेढीया (३० वर्षे), रवी रामजीभाई आजगिया (३६ वर्षे) (सर्व रा. गुजरात) यांना पोलिसांनी अटक केली, विविध कलमांन्वये त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# १० जिल्ह्यात उमेद मॉल उभारणार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत प्राथमिक तत्वावर राज्यातील १० जिल्ह्यात उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र) ची उभारणी केली जाणार असल्याची घोषणा ग्रामविकास मंत्रालयाने केली. महिला बचत गटाने तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचं काम या उमेद मॉलच्या माध्यमातून होणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबवणार असून अभियानात अत्युत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचा निर्णय घेल्यात आला. एकूण १ हजार ९०२ पुरस्कार दिले जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन होणार असून त्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.


## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | ऊद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


# आकाश दीपने उडवली इंग्लंडची झोप



ओव्हल : आकाश दीपला फक्त नाईट वॉचमन म्हणून खेळायला पाठवले असले तरी त्याने इंग्लंडची पुरती झोप उडवल्याचे पाहायला मिळाले. कारण आकाश दीपने फक्त चेंडू खेळण्याचे काम केले नाही, तर त्याने धावाही लूटल्या. आकाश दीपने यावेळी अर्धशतक झळकावले आणि त्याचबरोबर एक मोठा रेकॉर्ड आपल्या नाव-ावर केला. आकाश दीपने यावेळी १२ चौकारांसह ६६ धावांची दमदार खेळी साकारली.

साई सुदर्शन बाद झाल्यावर शुभमन गिल खरं तर फलंदाजीला यायला हवा होता. पण त्यावेळी शुभमन गिल न येता आकाश दीपला नाइट वॉचमन म्हणून फलंदाजीला पाठवले गेले. त्यावेळी सर्वांनाच तो आता चेंडू खेळून काढायची भूमिका साकारणार, असे वाटत होते. पण आकाश दीपने चौकारासह आपल्या धावा जमवायला सुरुवात केली. आकाश दीपने सामन्याच्या दुसऱ्याच दिवशी आपण फक्त नांगर टाकून खेळणार नसल्याचे स्पष्ट केले. पण आकाश दीपने खरी मजा आणली ती तिसऱ्या दिवशी. आकाश दीपला तिसऱ्या दिवशी लवकर बाद करण्याचे स्वप्न इंग्लंडचा संघ पाहत होता. पण त्याचवेळी आकाश दीपने इंग्लंडच्या संघावर जोरदार हल्ला चढवला. यशस्वी जयस्वालसारखा फलंदाज जिथे सावधपणे खेळत होता तिथे आकाश दीप चौकार वसूल करत होता. यापू-र्वीही आकाश दीपला नाइट वॉचमन म्हणून पाठवण्यात आले होते. आतापर्यंत आकाश दीपने फलंदाजीत ३१ ही सर्वोच्च धावसंख्या रचली होती. पण यावेळी तर त्याने अर्धशतक झळकावत रेकॉर्ड रचला आहे. कारण आकाश दीपचे हे पहिलेच अर्धशतक ठरले आहे. त्यामुळे आकाश दीपसाठी ही खेळी सर्वात महत्वाची असेल. आकाश दीपने अर्धशतकानंतरही दमदार फलंदाजी सुरुच ठेवली. आकाश दीपने त्यानंतरही फटकेबाजी केली आणि संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मदत केली.

फक्त काही चेंडूंचा पाहुणा.. अशी ओळख क्रिकेटच्या विश्वात केली जाते ती, नाइट वॉचमनची. पण आकाश दीपने मात्र धडाकेबाज फलंदाजी केली आणि आपली दखल सर्वांना घ्यायला लावली. आकाश दीपने यावेळी अर्धशतक खेळी साकारली आणि त्यामुळेच भारताला दीडशे धावांचा पल्ला गाठता आला.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021